पोलीस अधीक्षक कार्यालय, पालघर
नविन प्रशासकिय इमारत संकुल, प्लॉट नं. १, सेक्टर – १५
मोरेकुरण रोड, कोळगाव, नवनगर, ता. जि. पालघर
दुरध्वनी – ०२५२५ - २५११००
E-mail: - sp.palghar@mahapolice.gmail.com

प्रेसनोट क्र. ६८ दिनांक १७/०७/२०२५

मनोर पोलीस ठाणे हद्दित अवैधरित्या तंबाखूजन्य पदार्थाची विक्री करणाऱ्या दोन आरोपीस मा. अतिरिक्त सत्र न्यायालय, पालघर यांनी ठोठावली कारावासाची शिक्षा

मनोर पोलीस ठाणे गु.र.नं. ०९/२०२० भा.द.वि.स कलम ३२८, २७३, १८८ सह अन्न सुरक्षा मानके कायदा कलम २६(२), २७, २३, २६(२), ४, ३०(अ) प्रमाणे दाखल गुन्ह्यामधील आरोपी १) वसिम वाली मोहम्मद सीलिया २) सेरसिया मोहम्मद यासिन मा. हनीफ दोन्ही रा. ताज इन हॉटेल, टेननाका, पो. मनोर, ता. जि. पालघर यांनी दि.०८/०१/२०२० रोजी मौजे टेन गावचे हद्दित मुंबई-अहमदाबाद महामार्गावर गुजरात लेन लगत असलेल्या ताज इन हॉटेलच्या ताज पान ॲण्ड गिफ्ट कॉर्नर येथे एकूण ३६७५/- रुपये किंमतीचा महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला तंबाखूजन्य पदार्थ विक्रीकरीता त्यांचे कब्जात बाळगला म्हणून गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचा तपास हा सफौ/एम. पी. पाटील, तत्कालीन नेमणूक मनोर पोलीस ठाणे, सध्या तलासरी पोलीस ठाणे यांनी करुन आरोपीविरुध्द कौशल्यपुर्ण सबळ पुरावा गोळा करुन मा. अतिरीक्त सत्र न्यायालय, पालघर येथे दोषारोपपत्र सादर केले होते. नमूद दोन्ही आरोपींविरुध्द अपराध केल्याचा पुरावा शाबीत झाल्याने दि.१७/०७/२०२५ रोजी मा. श्रीमती ए. आर. राहाणे, अतिरीक्त सत्र न्यायालय, पालघर यांनी दोन्ही आरोपीस ३ वर्षे सश्रम कारावास व ५००० रुपये द्रव्यदंड तसेच द्रव्यदंड न भरल्यास ६ महिने सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली आहे.

सदर गुन्हयात सरकारी वकील श्री. अरुण मसराम, नोडल अधिकारी पोउपनि/संजय गावड, तपासी अंमलदार सफौ/एम. पी. पाटील, तत्कालीन नेमणूक मनोर पोलीस ठाणे, सध्या तलासरी पोलीस ठाणे व कोर्ट पैरवी सफौ/डी. व्ही. वंजारी यांनी कामकाज पाहिले.